## मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 16/01/2026

अर्जदार : यशवंत मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. धाराशिव

**विरूद्ध — गैरअर्जदार**

1) लवाद अर्ज क्र. 05/2025 1) रणदिवे धनंजय श्रीमंतराव रा. शांति निकेतन कॉलनी, धाराशिव ता. जि. धाराशिव 2) नांदे राजाभाऊ भगवान 3) कुदळे पांडुरंग रेवाप्पा दोघे. रा. सारोळा बु. ता. जि. धाराशिव

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 27/02/2026 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / अदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

## मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 20/02/2026

अर्जदार : चंद्रभागा अर्बन मल्टीस्टेट को-ऑप.क्रैडीट सोसायटी लि. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड,

**विरूद्ध - गैरअर्जदार**

1) लवाद अर्ज क्र. 17/2025 1. बडे बालासाहेब रामराव 2. आवाड सावलेराम भगवान दोघे. रा. दुकडेगाव ता. वडवणी जि. बीड 3. कांदे संजय भगवान रा. जहागीर मोहा ता. धारूर जि. बीड

2) ल. क्र. 18/2025 1. बडे बालासाहेब साहेबराव 2.बडे विलास शंकर 3.फुंदे अर्जुन हरिदास सर्व रा. देवदहिफळ ता. धारूर जि. बीड

3) क्र.19/2025 1. काजगुंडे अण्णासाहेब श्रीपती 2. तोडकर देवलिंग मन्मथ 3. आंबाड पांडुरंग रामभाऊ रा. आसरडोह ता. धारूर

4) क्र. 20/2025 1. कवचट अशोक बाबासाहेब 2. कारंडे भागवत वसंतराव 3. कवचट अनिल शिवनाथ रा. परभणी (के) ता. बीड

5) लवाद अर्ज क्र. 21/2025 1. केकान दैवशाला वैजनाथ 2. केकान वैजनाथ अच्युतराव सर्व रा. चाटगाव ता. धारूर जि. बीड

6) लवाद अर्ज क्र. 22/2025 1. बंडगर गणपती काशिनाथ 2. बंडगर मिठ्ठभाऊ गणपती सर्व रा. शिंदेवाडी ता. माजलगाव जि. बीड

7) क्र.23/2025 1. वाघचौरे सचिन धरणीधर 2. वाघचौरे धरणीधर रंगणाथ 3. खोत परमेश्वर मारुती सर्व रा.भोपा ता.धारूर जि. बीड

8) लवाद अर्ज क्र. 24/2025 1. सय्यद सुजत पापामिया रा. कासारी ता. धारूर जि. बीड 2. पठाण गफार जब्बार 3. शेख जुबेर मैनोद्दीन दोघे रा. देवदहिफळ ता. धारूर जि. बीड

9) लवाद अर्ज क्र. 25/2025 1. सय्यद नयुम पापामिया 2. उघडे श्रीमंत राधाकिसन सर्व रा. कासारी ता. धारूर जि. बीड

10) लवाद अर्ज क्र. 26/2025 1. शेख हाजु बासू 2. गायकवाड सोनाजी अश्रुबा 3. सय्यद अखिल स मोहम्मद 4. शेख शबाना हाजू सर्व रा. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड

11) क्र. 27/2025 1. बडे संभाजी माणिक 2. बडे बाबू राजेभाऊ रा. देवदहिफळ ता. धारूर 3. सिरसाट बंडु खंडु रा. संगम ता. धारूर

12)ल. क्र. 28/2025 1.बजंगे सुखदेव व्यंकोबा 2.बजंगे नामदेव राघोबा 3.बजंगे मुक्ताबाई सुखदेव रा. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड

13) ल. क्र. 29/2025 1. ढवळे अरुण सुदाम 2. झोडगे रामा धर्मा 3. ढवळे सुदाम अश्रुबा सर्व रा. हिवरगव्हाण ता. वडवणी जि. बीड

14) लवाद अर्ज क्र. 30/2025 1. डापकर शंकर व्यंकटराव 2. कांदे दिपक वसंत सर्व रा. संगम ता. धारूर जि. बीड

15) लवाद अर्ज क्र. 31/2025 1. सांगळे दीपक महादेव 2. केकान बालासाहेब माणिक सर्व रा. चाटगाव ता. धारूर जि. बीड

16) क्र.32/2025 1.मोरे कृष्णा रुपचंद (मयत) वारस पत्नी - मंगल कृष्णा मोरे 2.डापकर व्यंकटी संतराम रा.संगम ता.धारूर जि. बीड

17) क्र. 33/2025 1.खळगे कल्याण तुकाराम 2. निपटे बालासाहेब भागवत 3. गायकवाड राजाराम महादेव रा. पिंपरखेड ता. वडवणी

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 17/03/2026 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांन सह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / अदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

## मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 09/02/2026

अर्जदार : नाथ मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. मालेगाव ता. गेवराई जि. बीड

**विरूद्ध — गैरअर्जदार**

1) ल. क्र. 01/2025 1) भेरे राम बाबासाहेब 2) नरके शिवाजी भिमा 3) भेरे परमेश्वर रावसाहेब सर्व रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

2) क्र. 02/2025 1)राजेंद्र बाबासाहेब म्हस्के 2)म्हस्के सुरेश किसन 3) राजपुत विजयसिंग शिवसिंग रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

3) क्र. 03/2025 1)मधुकर भगवान थोरात 2) भेरे दादासाहेब नानासाहेब 3) डोंगरे महालिंग दत्तु सर्व रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

4) 04/2025 1)ताराबाई बदामराव पंडित 2) पंडित बदाम देवीदास 3) भगवान अप्पासाहेब घुले रा. हातगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

5) क्र. 05/2025 1) अनिल बदाम पंडीत 2) बदाम देवीदास पंडीत 3) ताराबाई बदाम पंडीत सर्व रा. हातगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

6) क्र. 06/2025 1) अशोक सुभाष बजंगे 2) सुभाष भागुजी बजंगे 3) राम अर्जुन बजंगे सर्व रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

7) क्र. 07/2025 1)सुधाकर निवृती मस्के 2)गोविंदराव माणिकराव माने 3) पांडुरंग जनार्धन शिंदे रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

8) क्र. 08/2025 1) सुभाष भागुजी बजंगे 2) अशोक सुभाष बजंगे 3) राम अर्जुन बजंगे सर्व रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

9) 09/2025 1)वैजिनाथ सदाशिव चोरमले 2) महादेव रामकिसन भोंडे 3) अजित सदाशिव चोरमले रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

10)10/2025 1)देवराव माणिकराव चोरमले 2)अशोक देवराव चोरमले 3)विश्वास सटवाजी कर्डिले रा. कांबी ता.शेवगाव जि. अहिल्यानगर

11) क्र. 11/2025 1) बाजीराव रघुनाथ नजन 2) बाबासाहेब बाजीराव नजन 3) बंडु सुर्यभान बजंगे रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

12) 12/2025 1) ज्ञानेश्वर बाबासाहेब मस्के 2) सुमित रमेश पंचारिया 3) अंकुश आसाराम साबळे रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

13) लवाद अर्ज क्र. 13/2025 1) खान एजाज अब्दुल समद खान 2) खान उजमा एजाज 3) खान मोहम्मद युसूफ अब्दुल समद खान सर्व रा. प्लॉट नं. 57, गट नं. 107, रेणुका माता कमान जवळ, सातारा परिसर, छत्रपती संभाजी नगर, ता. जि. छत्रपती संभाजी नगर

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 27/02/2026 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / अदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

---

जा. क्र. /सनिगे /क 88 नोटीस/ नापसं/जाहीर प्रगटन/2026 दिनांक 21/02/2026

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०च्या कलम ८८ (१) अन्वये व महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ च्या नियम ७२(२) जाहीर प्रगटन**

डी .वाय. पवळ, प्राधिकृत अधिकारी नारायणगड नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बीड,
माधव कॉम्प्लेक्स, पंचायत समिती बीड समोर, नगर रोड, बीड

नारायणगड नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बीड या संस्थेचे दिनांक 1 एप्रिल 2009 ते ३१ मार्च 2024 या कालावधीचे वैधानिक लेखा परीक्षण श्री बी.बी. चाळक जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग 2 सहकारी संस्था (प.दु.म.) बीड यांनी करून उक्त कालावधीमध्ये आढळून आलेल्या अनियमतेबाबत प्रशासकीय अहवाल दिनांक 11 मार्च 2025 रोजी सादर केला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता मुद्दा क्र.1 मध्ये कर्ज रक्कम वसुली वेळी कर्जदार सभासदांना रुपये 76,34,362/ ची नियमबाह्य सूट देऊन संस्थेचे आर्थिक नुकसान केले असल्याचे नमूद केले आहे. तसेच मुद्दा क्र. 2 नियमबाह्यरीत्या विनाकारण कर्ज वाटप करून केलेला गैरव्यवहार रुपये 1,96,38,102/ , मुद्दा क्र.3 संस्थेने जुने कर्ज प्रत्यक्ष वसुली न करता नियमबाह्यरित्या पुन्हा नवीन कर्ज वाटप करून केलेला गैरव्यवहार रुपये 17,21,716/ असे एकूण रुपये 2,89,94,180/ ( अक्षरी रुपये दोन कोटी एकोणनव्वद लाख चौऱ्यांनव हजार एकशे ऐंशी फक्त) संस्थेचे आर्थिक नुकसान केले असल्याचे प्रशासकीय अहवालामध्ये नमूद केलेली आहे. या संस्थेचे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 88 एक अन्वये वैधानिक कारवाई करणे साठी माझी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

आदेशासोबत प्राप्त परिशिष्ट अ मधील मुद्द्यांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 88 (1) व त्या खालील नियम 1961 चे नियम 72(1) एक अन्वये केलेल्या चौकशीच्या आधारे पुढील प्रमाणे मुद्दे निदर्शनास आले आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 चे नियम 72(2) अन्वये आपणावर नोटीस देण्यात येत आहे व आपणास सूचित करण्यात येते की, खाली दर्शविलेल्या मुद्द्यावर आपण **आपले म्हणणे दिनांक 05/03/2026 रोजी दुपारी 12:00 वाजता** नारायणगड नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बीड माधव कॉम्प्लेक्स, पंचायत समिती बीड समोर, नगर रोड, बीड संपर्क क्र . 084465 79999 येथे समक्ष उपस्थित राहून सादर करावे. सदर वेळेत आपले म्हणणे प्राप्त न झाल्यास अथवा दाखल केलेले म्हणणे समाधानकारक नसल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 चे नियम 72(3) अन्वये आरोपपत्र ठेवण्यात येईल याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट अ मध्ये दिलेल्या मुद्दा क्रमांक 1, 2 आणि 3 या तीन मुद्द्यानुसार संस्थेचे रुपये 2,89,94,180/ एवढे आर्थिक नुकसान झाले असून यास परिशिष्ट ब मध्ये दिलेले संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व शाखाधिकारी, विश्व सुपर मार्केटचे व्यवस्थापक, संस्थेचे मार्गदर्शक वैयक्तिक व संयुक्तरित्या पूर्णतः जबाबदार आहेत.

**परिशिष्ट ब**

| अ. क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| 1. | सौ ढाकणे मीरा रमेशराव | अध्यक्ष |
| 2. | सांगळे बजरंग निवृत्ती | उपाध्यक्ष |
| 3. | सौ ढाकणे विनिता राजेंद्र | संचालक |
| 4. | ढाकणे भीमराव साहेबराव | संचालक |
| 5. | सौ जयश्री नारायण खेडकर | संचालक |
| 6. | बाबुराव देवराव पवार | संचालक |
| 7. | बबन सदाशिव खेडकर | संचालक |
| 8. | सौ कांचन नारायण पालवे | संचालक |
| 9. | संजय ज्ञानोबा सानप | संचालक |
| 10. | चंद्रकांत गणपतराव दहिफळे | संचालक |
| 11. | कंठाळे भानुदास रामराव | संचालक |
| 12. | मुंढे ज्ञानोबा किसनराव | संचालक |
| 13. | ढाकणे अनिल पोपटराव | संचालक |
| 14. | सिरसट माणिक विठ्ठलराव | संचालक |
| 15. | गणगे चंद्रकांत हनुमंत | संचालक |
| 16. | शेख जमील शेख खलील | संचालक |
| 17. | सौ ढाकणे निर्मला प्रकाशराव | संचालक |
| 18. | सानप भागवत दिनकरराव | संचालक |
| 19. | ढाकणे नारायणराव केरोबा | संचालक |
| 20. | आघाव नंदूभाऊ लक्ष्मीनारायण | संचालक |
| 21. | ढाकणे भरत मारुती | संचालक |
| 22. | पवार एबी | व्यवस्थापक |
| 23. | सानप के आर | व्यवस्थापक |
| 24. | एम एम कुलकर्णी | व्यवस्थापक |
| 25. | देशमुख श्रीपाद भीमराव | व्यवस्थापक |
| 26. | दराडे आर व्हि | पासिंग ऑफिसर |

(डी.वाय.पवळ)
प्राधिकृत अधिकारी, नारायणगड नागरी सहकारी पतसंस्था
मर्या. बीड तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गेवराई**

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ •



*देगलूर तालुक्यातील करडखेड येथे प्रति वार्षिक महाशिवरात्र महोत्सव वरील महाशिवरात्र महोत्सव वै. गुरुदास महाराज यांनी सुरू केला असून ही गुरुदास महाराजांची परंपरा पूर्वो श्वर महादेव मंदिर करडखेड येथे गेल्या ४८ वर्षापासून चालू आहे आज ती परंपरा त्यांचे वंशज श्री श्रीपाद गुरुदास महाराज यांच्यामार्फत आजही प्रतिवर्षी हा महाशिवरात्रोत्सव अत्यंत उत्साहाने व भक्ती भावनेने साजरा होतो रात्री हजारो भाविकाच्या सानिध्यामध्ये श्रीक्षेत्र महादेव मंदिर पूर्वोश्वर करडखेड संपन्न झाली. (छाया –विशाल पवार )*

# 'चिखला' येथील प्रकार पुरोगामी महाराष्ट्राला काळिमा फासणारा: राजेंद्र आमटे

## शिव, शाहू, फुले, आंबेडकर, साठे यांच्या महाराष्ट्रात दुर्दैवी प्रकार

**बीड । प्रतिनिधी**

देशात महाराष्ट्र पुरोगामी म्हणून देशाला दिशा देणार राज्य शिव, शाहू, फुले, आंबेडकर, साठे यांच्या विचाराचा वारसा सांगणाऱ्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये शिवरायांचे स्मारक काढू देत नाही म्हणून महिलेला मारहाण हा प्रकार अतिशय निंदानीय आहे, अशी प्रतिक्रिया शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हा प्रमुख राजेंद्र आमटे यांनी दिली.

शिव, शाहू, फुले, आंबेडकर, साठे, अहिल्यादेवी होळकर अशी विचाराची खाण असणारा महाराष्ट्र पत्नाकडे जात असल्याचे पाहून शरमेने खाली मन जात आहे आरोपीला जात नसते असते ती फक्त विकृत मानसिकता महाराष्ट्रातील विकृत मानसिकता ठेचून काढल्या पहिजेत.

काय चाललं आहे महाराष्ट्रांत ? अत्याचार,बलात्कार, विनयभंग, हत्या, अठरापगड जाती गुण्यागोविंदाने नांदत असताना



हे होणारे प्रकार अतिशय दुर्दैवी आहेत चिखला येथील प्रकार पुरोगामी महाराष्ट्राला काळिमा फासणारा आहे शिव शाहू फुले आंबेडकर साठे अहिल्यादेवी होळकर यांच्या विचाराचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रामध्ये निदानीय आहे आरोपींना तत्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## फडात ऊस आणणाऱ्या ट्रॅक्टरला अज्ञात कारणाने आग

**माजलगाव । प्रतिनिधी**



उसाच्या फडात ऊस आणण्यास गेलेल्या ट्रॅक्टरला अचानक अज्ञात कारणाने आग लागली असून ट्रॅक्टर जळून खाक झाल्याची घटना शनिवारी दुपारी एक वाजे दरम्यान माजलगाव तालुक्यातील सिमरी पारगाव येथे घडली. येथील मंडोदरी भीमराव काळे यांच्या सिमरी पारगाव अंतर्गत एक बुर्जी शिवारात गट नंबर १३ मध्ये तीन एकर ऊस तोडणीचे काम चालू आहे, गणेश भागुराम चव्हाण यांचे ट्रॅक्टर तोडलेला ऊस आणण्यासाठी शेतात गेले असता, शनिवारी दुपारी अज्ञात कारणाने ट्रॅक्टरला आग लागली बघता बघता संपूर्ण ट्रॅक्टर जळून खाक झाले. या घटनेनंतर चालू असलेल्या शेतातील ऊसालाही आग लागली मात्र तिथे असलेल्या ऊसतोड मजुरांनी तात्काळ आग विझवण्याचे काम केल्याने मोठे नुकसान टळले. मात्र ट्रॅक्टर जळून राख झाल्याने काळे यांचे मोठे नुकसान झाले आहे.

## इंग्लिश बनावटीचे पिस्तूल बाळगणारे दोघे पोलिसांच्या ताब्यात

### तालुक्यातील ब्रह्मगाव– हाजीपुर दरम्यान सापळा रचून केली कारवाई

### आष्टी पोलीसांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला

**आष्टी । प्रतिनिधी**

इंग्लिश बनावट पिस्तूल घेऊन चारचाकी वाहनाने ब्रम्हगांव हाजीपूर रस्त्याने येत असल्याची गोपनीय माहिती आष्टी पोलिसांना मिळताच त्यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार सापळा रचून चारचाकीसह दोघांना ताब्यात घेतले असून दोन पिस्तूल जप्त करण्यात आल्याची कारवाई गुरूवारी रात्री ९ च्या दरम्यान केली. आष्टी पोलिस ठाणे हद्दीतील ब्रम्हगांव हाजीपूर रस्त्यावरून एका चारचाकी वाहनातून काही व्यक्तीजवळ पिस्तूल असल्याची गोपनीय माहिती मिळताच ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांनी कर्मचाऱ्यांना ही माहिती देताच या रस्त्यावर सापळा लावून गुरूवारी रात्री ९ च्या दरम्यान राहूल खोटे रा.मूगगाव,अमृत भोसले रा.पारगांव घुमरा ता.पाटोदा जि.बीड या दोघेजणांना ताब्यात घेऊन दोन इंग्लिश बनावटीचे



पिस्तुल जप्त करत अटक करण्यात आली आहे.यात इतर आरोपीचा देखील समावेश असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. घातपातासाठीची तयारी नव्हती ना? ही कारवाई आष्टीचे उपअधीक्षक बाळकृष्ण हानपुडे, पोलिस निरीक्षक शरद भुतेकर याच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे, पोलीस हवालदार प्रवीण क्षीरसागर, नितीन काकडे, गणेश जगताप, परमेश्वर तागड, बब्रुवाण वाणी यांनी केली.



*चिखला ,ता.लोणार येथे शिवजयंती च्या दिवशी संजिवनी वाघ यांचेवर झालेल्या भ्याड हल्याचा मराठा सेवा संघ, बुलढाणा च्या वतीने निषेध करण्यात आला व संजिवनी ताईंना धीर देऊन मराठा सेवा संघ त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे ह्याची ग्वाही दिली. यावेळी मराठा सेवा संघाचे राज्य संघटक डॉ मनोहर तूपकर मराठा सेवा संघ बुलढाणा चे कार्याध्यक्ष शिवश्री रविकांत काळवाघे मराठा सेवा संघ बुलढाणाचे जेष्ठ मार्गदर्शक शिवश्री आनंदराव चनखोरे . शिवश्री विजुभाऊ काकडे शिवश्री दत्तात्रय शेळके व मराठा सेवा संघ तथा संभाजी ब्रिगेडचे बहुसंख्य कार्यकर्ते हजर होते.*

## प्रतिवर्ष प्रमाणे रमजानच्या महिन्यात महावितरणने लोडशेडिंग बंद करुन सहकार्य करावे : शेख खिजर, जयदेव शिंगणे

**तलवाडा । प्रतिनिधी**

पवित्र रमजानला सुरुवात झाली असुन पवित्र रमजान महिन्यासह आणेक सनावाराच्या दिवसात महावितरण लोडशेडिंगच्या बाबतीत सहकार्य करत आलेली असुन यंदाही रमजानच्या पावन महिन्यास सुरुवात झालेली असल्याने रात्री तराहवीची नमाज (प्राथना) व पहाटे पवित्र रोजा (उपवास) धारण करन्यासाठी बाल गोपालासह वयोवृद्ध तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात रोजा(उपवास) धारण करन्यासाठी पहाटे तीन वाजल्या पासुन तय्यारी साठी जागरण करत असतात या काळात विध्युत पुरवठा सुरळीत आसने गरजे असुन महावितरणचे पदाधिकारी प्रतिवर्ष सहकार्य करत असुन त्याच प्रमाणे यंदाही महिनाभर लोडशेडिंग बंद करुन सहकार्य करावे आशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी महावितरण कडे निवेदनाव्दारे केली आहे. निवेदनात म्हण्टले आहे की दिनांक १९ पासून मुस्लिम समाजाचा अत्यंत पवित्र व धार्मिक दृष्ट्या महत्वपूर्ण असा रमजान महिना सुरू होत आहे. रमजान हा केवळ उपवासाचा महिना नसून तो संयम, प्रार्थना, आत्मशुद्धी, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेचा संदेश देणारा पवित्र कालखंड आहे. या महिन्यात मुस्लिम बांधव पहाटेच्या सहरीपासून ते सूर्यास्तानंतरच्या इफ्तारपर्यंत रोजा पाळतात तसेच रात्री तरावीह नमाज, कुरआन पठण आणि विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. मात्र सध्या तलवाडा (ता. गेवराई) तसेच बीड जिल्हयातील अनेक भागांत वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याची गंभीर बाब निदर्शनास येत आहे. विशेषतः तलवाडा परिसरात सतत वीज खंडित होत असल्याने नागरिकांत मोठ्या प्रमाणावर नाराजी व्यक्त होत आहे. रमजानसारख्या पवित्र महिन्यात सहरी व इफ्तारच्या वेळी वीज नसल्यास महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले व रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

## धम्मदीप बुद्ध विहारात शिवजन्मोत्सव उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

धम्मदीप बुद्ध विहार बलभीम नगर, शिवाजीनगर, पालवण रोड बीड येथे बहुजन प्रतिपालक कुळवाडी भूषण रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम बलभीम नगर महिला मंडळाच्या वतीने आयोजित केला होता या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे आयु.प्रशांत वासनिक, तानाजी शिंनगारे,डी.जी वानखेडे यांची उपस्थिती होती मान्यवरांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध,रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले, महमानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सामूहिक त्रिसरण पंचशील घेण्यात आले

## छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरणविषयक दृष्टी शाश्वत विकास घडविणारी होती: डॉ. दिनेश कचकूरे

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने महाविद्यालयामध्ये इतिहास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्ताने आयोजित छत्रपती शिवाजी महाराजांची पर्यावरण विषयक नीती या विशेष व्याख्यानातून डॉ. दिनेश कुचकुरे यांनी उपस्थितांशी संवाद साधताना सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज रयतेचे राजे होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या गडकिल्ल्यांमध्ये पुरेशा पाण्याची सुविधा होती. पर्यावरण विषयक छत्रपती शिवाजी महाराजांची दृष्टी व्यापक होती. पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन करणे महाराजांना महत्त्वाचे वाटत होते. शेतीसाठी, मानवी वसाहतीसाठी पाणी गरजेचे असते. छत्रपती शिवाजी महाराज एक आदर्श राजा, उत्तम प्रशासक, अर्थनीतीज्ञ, युद्धनीती, आरमार विषयक दृष्टिकोन असलेले लोककल्याणकारी राजे होते असे मत नमूद केले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराची आवश्यकता आजच्या काळात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले गड किल्ले आजच्या काळातील बांधकाम क्षेत्रातील व्यक्तींना आदर्श शिकविणारे आहेत. मानवाच्या विविध क्रियांमुळे होणारे पर्यावरणाचे प्रदूषण टाळण्यासाठी छत्रपतींनी निर्माण केलेल्या सुविधा विशेष मुलगामी ठरणाऱ्या होत्या.

## बीड च्या पालवण या गावामध्ये मध्यरात्री बसवला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, निखिल मस्के या तरुणाने स्वखर्चाने बसवला पुतळा, शिवप्रेमी मध्ये आनंदाचे वातावरण

**बीड । प्रतिनिधी**

अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, यांची काल ३६९ वी जयंती काल साजरी झाली, त्या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परंतु सर्वात महत्वाचा आणि महाराजांच्या विषयी खरे प्रेम दाखवणारा उपक्रम बीडच्या पालवण या गावच्या मावळ्यांनी राबवला. त्यासाठी नियोजनबध्द रणनिती आखण्यात आली, बीड शहरालगत पालवण या गावांमध्ये जिल्हा परिषद शाळेसमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा हा भव्य दिव्य पुतळा उभा करण्यात आला आहे. तीन महिन्यापासून याची तयारी सुरु होती. २० शिवशंभू भक्त त्यासाठी काम करत होते. रात्री ११ ते रात्री ३ पर्यंत पुतळ्याच्या उभारणीचे काम सुरु होते.ओंकार डुकरे, अमोल शेळके, अभिषेक जठाळ, भगवान मस्के,अशोक मस्के, युवराज मस्के, विजय मस्के, विकास मस्के, आदेश महागोविंद, बाबासाहेब



सातपुते, समाधान मस्के, गिरी, सक्षम मस्के, रमेश, घोलप योगेश घोलप, अशा अनेक शंभूभक्तांनी त्यासाठी परिश्रम घेतले.अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य पुतळा पालवण या गावामध्ये उभारावा अशी तमाम शिवभक्तांची इच्छा होती. परंतु आजपर्यंत कोणीही या साठी पुढाकार घेतला नव्हता. मात्र निखिल मस्के पाटील, यांच्यासह काही मावळ्यांनी गनिमी कावा

# सांगवी पाटणमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

### भव्य मिरवणूक, सांस्कृतिक कार्यक्रम व कीर्तनातून स्वराज्याच्या विचारांचा जागर

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील सांगवी पाटण येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमात वारकरी संप्रदायाचे विद्यार्थी, गावातील नागरिक, माता-भगिनी, युवक तसेच सर्व जाती-धर्मातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. स्वराज्याच्या आदर्शांचा जागर: छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेद्वारे अत्याचारी सत्तेला आव्हान देत लोककल्याणकारी राज्यव्यवस्थेचा आदर्श निर्माण केला. गनिमी काव्याचे प्रभावी युद्धतंत्र, किल्ले बांधणी, जलसंधारण, व्यापार-उद्योगांचा





विकास आणि सक्षम प्रशासन व्यवस्था या माध्यमातून त्यांनी दूरदृष्टीचे नेतृत्व दाखवून दिले. सर्व समाजघटकांना एकत्रित घेऊन उभे केलेले त्यांचे प्रशासन आजही प्रेरणादायी मानले जाते. याच विचारांच्या प्रेरणेने सांगवी पाटण येथे शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. पालखी मिरवणूक व सांस्कृतिक सादरीकरण: जिल्हा परिषद शाळेतून छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा पालखीतून गावातून मिरवण्यात आली. सुदर्शन विद्यालय व सार्वजनिक गणेश उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महंत काशिनाथ शास्त्री महाराज यांच्या उपस्थितीत वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. उत्सवात गावकऱ्यांनी फुगडी व लेझीम सादर करून पारंपरिक रंगत वाढवली, तर शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर नृत्य सादरीकरणातून उपस्थितांची दाद मिळवली. ग्रामपंचायत कार्यालयासमोर मिरवणूक आल्यानंतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली. त्यानंतर महाआरती पार पडली. दोन्ही शाळांच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कीर्तनातून विचारप्रबोधन : सायंकाळी ७ ते ९ या वेळेत भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री यांचे कीर्तन झाले.

## राज्यस्तरीय शिवचरित्र सामान्यज्ञान स्पर्धेत अंजली साळवे यशस्वी; द्वितीय क्रमांक पटकावला



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालय, इतिहास विभाग व सुंदररत्न करिअर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १८/०२/२०२६ रोजी राज्यस्तरीय शिवचरित्र सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शिवचरित्रावर आधारित प्रश्नांमधून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची कसोटी पाहण्यात आली. या स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदवत कु. अंजली बालासाहेब साळवे हिने उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. तिच्या या यशामुळे संस्थेचे व पालकांचे नाव उज्ज्वल झाले आहे. कु. अंजली साळवे हिचे सर्वत्र मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून तिच्या पुढील शैक्षणिक व स्पर्धात्मक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## प्रभाबाई केंद्रे यांचे निधन

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील होळ येथील प्रभाबाई सखाराम केंद्रे यांचे वृद्धपकाळाने शुक्रवारी (दि.२०) निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्यांच्यावर होळ येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या भगवान युवा सेनेचे अध्यक्ष विजय केंद्रे यांच्या मातोश्री होत.